शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०९/२०२५

| | | |
|---|---|---|
| श्री.पपीन शामराव चौधरी<br>रा.रेणूका नगर, गल्ली नं.४, डॉ.तुपे शेजारी,<br>यड्राव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ४१६१४६ | } | तक्रार अर्जदार |
| **विरूध्द** | | |
| १. श्री.नारायण बाबासाहेब एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी<br>ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर ४१६११५<br>२. श्री.व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी,<br>गेविंदराव हायस्कूल कॅम्पस, राजवाडा, इचलकरंजी<br>ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. | } | वि.प. |

श्री.नारायण बाबासाहेब एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांचे श्री.व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांचेकडील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. पपीन शामराव चौधरी यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०३/०३/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारदाराचे तक्रार अर्जातील कथन असे असे आहे की :-**

१. प्रस्तुतची तक्रार ही तक्रारदार यांना कोणतही संधी न देता तडकाफडकी अन्यायकारक निलंबन केलेने तक्रारदार हे रिस्पॉंडंट नं.१ महाविद्यालयाचे कर्मचारी या नात्याने काम करित आहेत. तक्रारदार यांचे शिक्षण १० वी पर्यंत झालेले आहे. तक्रारदार यांनी आज अखेर अतिशय प्रामाणिकपणे, सचोटीने, सातत्याने निष्कलंक अशी सेवा रिस्पॉंडंट महाविद्यालय यांचेकडे केलेली आहे. तक्रारदार SC(ढोर) हे या मागास वर्गातील आहेत.

२. यातील रिस्पॉंडंट हे महाविद्यालय असून रिस्पॉंडंट नं. २ ही संस्था असून त्यांच्यामार्फत रिस्पॉंडेंट नं. १ महाविद्यालय चालविले जाते. रिस्पॉंडंट नं. ३ ही शासकीय यंत्रणा असून त्या यंत्रणा मार्फत रिस्पॉंडंट नं. १ महाविद्यालयास अनुदान मिळते. अशा स्थितीत रिस्पॉंडंट व तक्रारदार यांचे मालक कर्मचारी असे नाते आहे.

३. तक्रारदार हे दि.३१/०३/२००३ रोजीच्या नेमणुक पत्राने रीतसर व योग्य त्या भरती प्रणालीने रिस्पॉंडंट नं.१ महाविद्यालयात शिपाई या पदावर रुजू झाले. तक्रारदार यांनी अतिशय प्रामाणिकपणे व

सचोटीने काम केलेने त्यांचा परीविक्षाधीन कालावधी अतिशय उत्तम व वाखाणण्यासारखा पूर्ण झाला. त्यामुळे तक्रारदार हे दि.२३/०६/२००५ रोजीच्या पत्राने सदर पदावर कायम झाले.

४. तक्रारदार हे अतिशय उत्तमरित्या व प्रमाणिकपणे काम करीत असलेने त्यांना सन २०११ साली ग्रंथालय परिचर या पदावर पदोन्नती देणेत आली. सदर पदावर तक्रारदार यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने काम केलेमुळे तकारदार यांना सन २०१४ मध्ये कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती देणेत आली व तेव्हापासून तक्रारदार हे क्लार्क या पदावर काम करू लागले. तक्रारदार हे क्लार्क पदावर अत्यंत प्रामाणिकपणे, सचोटीने व सातत्याने काम करीत होते. तथापि रिस्पॉंडंट व्यवस्थापनातील काही लोकांना तक्रारदार सारखी व्यक्ती शिपाई पदावरून क्लार्क होऊन अत्यंत चांगल्या पद्धतीने आपले कर्तव्य बजावून स्थिर होते व पद सिध्द होत आहे, ही बाब सहन झाली नाही. त्यांनी तक्रारदाराबाबत एक ना अनेक षड्यंत्र रचनेस सुरवात केली. त्यामध्ये एक ना अनेक प्रकारे दैनंदिन कामकाजावेळी वाट्टेल ते बोलुन अपमानित करणे, त्यांच्या पत्र व्यवहारामध्ये खोट्या नाट्या चुका काढणे, काही संबंध नसलेल्या गोष्टीस व पत्र व्यवहारास जबाबदार धरणे व काही हिशोबामध्ये चुका आहेत, घोळ आहे. असे खोटे आरोप करणे व त्या त्या प्रत्येकवेळी तक्रारदारास दमदाटी देऊन अत्यंत खालच्या दर्जाची भाषा वापरून सातत्याने लेखी व तोंडी माफी मागायला लावणे, कोणतीही चूक/गुन्हा केलेला नसतानाही तो जबरदस्तीने दडपण आणून, भीती दाखवून, लेखी व तोंडी कबूल करायला लावणे व त्याचा दुरुपयोग करून तक्रारदारांच्यावर वेगवेगळ्या बेकायदेशीर अयोग्य अशा कारवाया करणे, मालक/व्यवस्थापन या पदाचा व अधिकाराचा एक ना अनेक प्रकारे गैरवापर करून तक्रारदारांची मुस्कटदाबी करणे हा पायंडा/प्रघातच होऊन गेला.

५. तरीही तक्रारदार हा सर्व अन्याय सहन करून निमूटपणे आपली कर्तव्य बजावीत होते. तथापि रिस्पॉंडंट व्यवस्थापनातील लोकांना तक्रारदार यांचे प्रमोशन सहन न झाल्याने त्यांनी तक्रारदार यांच्यावर खोटे नाटे आरोप करून मानसिक दडपण आणून त्रास दिला व तक्रारदार यांचे पुन्हा सन २०१४ साली क्लार्क या पदावर ग्रंथालय परिचर या पदावर पदानवती केली. त्यांचेबरोबर तक्रारदार यांना कोठेही दाद, तक्रार, फिर्याद वगैरे करावयची नाही. असे रिस्पॉंडंट व्यवस्थापनातर्फे दमदाटी केली व तसे ब-याच वेळेला लिहूनही घेतले. यातील तक्रारदार यांनी कुटूंबाचा विचार करून आपली आर्थिक कुचंबना व अडचण होणार, आपले कौटुंबिक आयुष्य उध्वस्त होईल या भीतीने तक्रारदार यांना रिस्पॉंडंट यांचे विरुध्द आजअखेर कोणतीही तक्रार केली नाही व रिस्पॉंडंट यांनी करूनही दिली नाही.

६. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी अतिशय सचोटीने व प्रामाणिकपणे काम केलेने पुन्हा तक्रारदार यांना दि.०८/०९/२०२० रोजीच्या पत्राने कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती केली. तक्रारदार हे

त्याही पदावर अतिशय सचोटीने काम करू लागले. परंतु तक्रारदार यांचे गैरहीत न पाहणा-या लोकांनी तक्रारदार यांची बढती भरभराट सहन न झाल्याने तक्रारदार यांचे विरोध निरनिराळे कारस्थाने रचून तक्रारदार यांची कारकीर्द खराब करणेचा प्रयत्न केला. त्यामध्ये रिस्पाँडंट प्राचार्य सहित महाविद्यालयाचे पदाधिकारी सहभागी आहेत व त्यांनी तक्रारदार यांचे विरोधात तक्रारदार यांचे कामामध्ये चुका काढणे, अडथळा आणणे व त्यासाठी खोट्या नोटीसा पाठविणे जबरदस्तीने चूक नसतानाही चुका झालेल्या आहेत असे दाखविणे, लेखी व तोंडी माफी मागायला लावणे अशा प्रकारची कृत्ये केली व एक ना अनेक प्रकारे तक्रारदारांची मानसिक व आर्थिक कुचंबना करून सामाजिक व बदनामी करणेचा प्रयत्न केला.

७. अशा स्थितीत यातील रिस्पाँडंट यांनी पुन्हा तक्रारदार यांना शिपाई या पदावरून कमी करून नोकरीतूनच काढून टाकावयाचे असा निष्कर्ष काढून त्या दृष्टीने एक ना अनेक अशा कारवाया तक्रारदारविरुध्द रिस्पाँडंट यांनी सुरु केल्या. त्यामध्ये रिस्पहृंडंट नं.१ यांची व तक्रारदार यांचे हित न पाहणा-या अन्य सहका-यांची फार मोठी भूमिका आहे. त्याचाच भाग म्हणून तक्रारदार यांना दि. ०८/०१/२०२५ रोजी रिस्पॉंडंट नं.१ प्राचार्यांनी कारणे दाखवा नोटीस दिली. त्यामध्ये तक्रारदार यांचे विरोधात खोटे नाटे निराधार असे आरोप करून शिस्त भंगाची कारवाई का करू नये ? याचा खुलासा मागितला.

८. दि.११/०१/२०२५ रोजी प्राचार्यांनी निरोप देऊन बोलावून घेतले. त्यावेळी तक्रारदार व त्यांची पत्नी, मुलगी रेंदाळ येथे गेले व फोन केला. तेथे ते नव्हते, कॉलेजमध्ये गेले होते. तेथे आम्ही (Sic) तक्रारदारास काढून टाकण्याची धमकी देऊन तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांकडून जबरदस्तीने सह्या घेतल्या व गुन्हा कबूल करा अशी दमदाटी केली. तक्रारदार हे मला कामावरून काढून टाकू नका मी कर्ज काढलेले आहे. माझे कुटुंब रस्त्यावर येईल अशी त्यांना नम्र विनंती करू लागले. तुम्ही चेअरमनांच्या घरी जावा ते तुम्हाला काढून टाकणार आहेत, तुम्हाला बोलावलेले आहेत असे त्यांनी तक्रारदारास सांगितले. या संबंधी आपण (Sic) दिलेल्या दोन डीव्हीडी माझ्या ताब्यात आहेत. त्यावेळी त्या मी पुराव्याच्या कामी दाखल करेन.

९. सदर नोटीसीस तक्रारदार यांनी दि.१३/०१/२०२५ रोजी रीतसर खुलासेवार सत्य गोष्टी नमूद करून खुलासाही केलेला आहे. सदरचे सत्य समोर येताना रिस्पाँडंट यांना त्याचाच राग येऊन रिस्पाँडंट यांनी तक्रारदार यांना काहीही कारण नसताना कोणतीतरी कडक कारवाई करायची असे त्यांनी ठरवलेचे तक्रारदार यांना समजले. यातील रिस्पाँडंट नं.१ प्राचार्य हे तक्रारदार यांच्याकडे कायम जबरदस्तीने नोकरीचा राजीनामा मागत होते व आहेत.

१०. वस्तुतः दि.२३/०१/२०२५ रोजी यातील रिस्पॉंडंट तर्फे म्हणजेच प्राचार्य व ऑफिस अधीक्षक हे दोघे चेअरमन साहेब यांच्या ऑफिस केबिनमध्ये गेले होते व त्यावेळी चेअरमन यांनी तक्रारदारास फोन करून काहीही कारण नसताना तक्रारदार यांना अर्वाच्च भाषेत बोलून दमदाटी देऊन फौजदारी गुन्हा करतो असे बोलून भांडण काढले. त्यामुळे तक्रारदार हे त्याच दिवशी सायंकाळचे दरम्यान सदर लोकांच्या विरोधात फिर्याद देणेसाठी गेले असता तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी प्राचार्य व चेअरमन म्हणजेच संस्थेच्या मुख्य पदाधिका-यांचे विरुद्ध तक्रार असल्याचे लक्षात येताच सदरच फिर्याद घेणेस टाळाटाळ केली. सदर लोकांना आम्ही बोलावून घेत आहोत व उदईक यावेत अशी तोंडी सूचना पोलीस अधिका-यांनी तक्रारदार यांना दिली. त्यामुळे तक्रारदार हे घरी परत आले व दुस-या दिवशी सकाळी ६ वाजता पुन्हा पोलीस स्टेशनला गेले असता त्यावेळी संजय कांबळे व जाबदार हे गावभाग पोलीस स्टेशनमध्ये होते त्यांनी तुम्ही अहृनलाईन तक्रार करा व परत काय घडते ते ११२ ला फोन करा असे सांगितेल. त्यामुळे तक्रारदार हे नेहमीप्रमाणे आपल्या कामावर हजर होऊन काम सुरु केले असता तेथे ऑफिस अधीक्षक यांनी तक्रारदार यांना बोलावून दमदाटी व शिवीगाळ करणेस सुरवात केली व संस्थेच्या पदाधिका-यांचे विरोधात पोलीसात तक्रार करता तुम्हाला बघून घेतो. अशी दमदाटी देऊन काढून टाकण्याची भाषा करू लागले व त्यावेळी मस्टरला सही करणेस देणार नसलेचे सांगितले त्यावेळी तक्रारदार यांनी पोलिसांना ११२ ला फोन केला. त्यामुळे तक्रारदार यांना प्रचंड मनस्ताप होऊन भोवळ येऊन ते ऑफिसच्या मेन दरवाज्याच्या आतील बाजूस बेशुध्द पडले व त्यांना पोलिसांनीच ॲम्बुलन्समधून दि.२४/०१/२०२५ रोजी सरकारी दवाखान्यात दाखल करावे लागले.

११. अशा स्थितीत त्याच दिवशी संस्थेचे कर्मचारी शशांक कवटगे व महेश चौगुले हे हॉस्पिटलमध्ये येऊन दमदाटी करून निलंबनाचे पत्र देऊ लागले व तक्रारदार याची पोहोच सही मागू लागले. त्यावेळी तक्रारदार हे हॉस्पिटलमध्य झोपले असता त्यांचे पत्नीते त्यांना मी उठवते व नंतर पत्र द्या असे सांगितले असता त्यांनी तक्रारदार यांचे पत्नीस अर्वाच्च भाषेत बोलू लागले व लांछनास्पद वागणूक देऊन दमदाटी करू लागले. त्यावेळी तक्रारदार यांच्या पत्नीने सांगितले की नुकतेच सलाईन संपलेले आहे त्यांना सही करता येत नाही. त्यावेळी त्यांनी जबरदस्तीने दमदाटी करून तुम्हाला लई मस्ती आली आहे असे म्हणून व जातीवाचक शिवीगाळ करणेस सुरवात केली व तुम्हाला संस्था बघून घेईल अशी धमकी दिलेली आहे. दि.२४/०१/२०२५ रोजी सेवेतून तात्काळ निलंबन करण्यास येत असल्याचे सांगितले. परंतु तक्रारदार यांनी पत्र न घेतलेने प्राचार्य यांनी निलंबन आदेश व्हॉट्सॲप, ईमेल व पत्राने पाठविले व निलंबन केले. तक्रारदार यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी दिलेली नाही. सदर गोष्टीचा तक्रारदार यांना प्रचंड धक्का बसला त्यातच दि.१०/०२/२०२५ रोजीचे असलेले खातेनिहाय चौकशीची नोटीस व

दोषारोपपत्र पाठविले. ते तक्रारदार यांना दि.१३/०२/२०२५ रोजी पोस्टाने मिळाले. त्यास रीतसर खुलासा तक्रारदार यांनी दिला आहे. तरी त्याही बाबीचा विचार व्हावा व दोषारोपपत्र व चौकशी समिती रदद व्हावी ही विनंती.

१२. अशा रीतीने यातील रिस्पॉंडट यांनी तक्रारदार यांच्यावर फार मोठा अन्याय केला आहे. त्याबाबत ताबडतोब रिस्पॉंडंट यांच्यावर कारवाई करून तक्रारदार यांना न्याय मिळावा. तक्रारदाराचे बिनशर्त निलंबन मागे घेण्याबाबत आदेश व्हावा व तक्रारदार विरूध्द कोणतीही बेकादेशीर कारवाई करू नये व खाते निहाय चौकशी रदद करणेतमी तक्रारदार यांनी तक्रार अर्जात विस्तृतची तक्रार नमूद केली आहे. याबाबत थोडक्यात संक्षिप्त तक्रार खालीलप्रमाणे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री.पपीन शामराव चौधरी हे दि.०१/०४/२०२३ रोजी शिपाई म्हणून महाविद्यालयात रूजू झाले व त्यांना दि.०४/१०/२०११ रोजी ग्रंथालय परिचर व दि.३१/१२/२०२४ रोजी कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती दिली. या पदावर काम करत असताना त्यांच्या हातून गंभीर गैरकृते घडले व कनिष्ठ लिपिक पदावरून ग्रंथालय परिचर या पदावर दि.२८/१०/२०२५ च्या आदेशाने पदावनत करण्यात आले. तथापि पुन्हा दि.०८/०९/२०२० च्या आदेशाने महाविद्यालयात कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती देण्यात आली व या पदोन्नतीची मागणी श्री.पपीन चौधरी यांनी केली होती. दर्दैवाने त्यांना पुन्हा कनिष्ठ लिपिक या पदावर काम करीत असताना त्यांच्याकडून गंभीर चूका, हिशोबात चुका, अपहार अशा गोष्टी घडत राहिल्या व त्यांना समजावून सांगून वर्तनात सुधारणा होईल अशी आशा धरली तथापि त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. श्री.पपीन शामराव चौधरी यांना दि.१९/१२/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली व त्यास त्यांनी दि.२३/१२/२०२३ रोजी लेखी खुलासा देवून पदावनत होण्यास तयार आहे असे कथन केले पण हे दि.२३/१२/२०२३ चे पत्र दि.२८/१२/२०२३ च्या पत्राने अमान्य केले. पण त्यांचे वर्तन कडक शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र होते. तथापि तदनंतर श्री.पपीन शामराव चौधरी यांनी व्यवस्थापनास भेटून यापुढे चुका करणार नाही, अपहाराची रक्कम जमा करेन असे कळविले व सौम्य शिक्षा देण्याची विनंती केली.

श्री.पपीन शामराव चौधरी यांनी दि.०२/०२/२०२४ रोजी नोटराईज्ड हमीपत्र दिले व त्यावर त्यांची पत्नी, त्यांचे मेहूणे व त्यांचा भाऊ यांचीही साक्षीदार म्हणून त्यावर सही आहे. त्यांनी तपशिलवार त्यांच्या हातून घडलेले गैरवर्तन नमुद केले व अपहाराची रक्कम रू.८०,०००/- महाविद्यालयाकडे चेकने जमा केली व ॲफिडिव्हेटद्वारे महाविद्यालयात ग्रंथालय परिचरचे पद रिक्त नसल्याने शिपाई पदावर काम करण्याचे मान्य केले. त्यांच्या नोटराईज्ड हमीपत्रावर निर्णय घेवून

दि.२६/०२/२०२४ च्या पत्राने त्यांच्या हातून गंभीर गैरकृत्य घडले असले तरी शिपाई पदावर पदावनत करून सौम्य कारवाई केली.

पदावनत केल्यानंतर त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही व दि.२९/०९/२०२४ रोजी मा. प्राचार्यांच्या केबीनमध्ये गैरवर्तन केले व दि. २४/०१/२०२५ रोजी अधिक्षक श्री.अनोश सदाशिव गायकवाड यांना पाठीमागून जोरात कानपाडीत मारली. (श्री.अनोश सदाशिव गायकवाड यांना रक्तदाब, मधुमेहाचा त्रास आहे व त्यांच्या ह्यदयाची ॲन्जीओप्लास्टीही झाली आहे व या बाबी श्री.पपीन शामराव चौधरी यांना माहीत आहेत.) श्री.पपीन शामराव चौधरी यांनी श्री.अनोश सदाशिव गायकवाड यांना केलेल्या मारहाणीमुळे त्यांना सेवाभारती या दवाखान्यात त्या दिवशी दाखल करावे लागले व तसे ते सकाळी ८ वाजून ४५ मिनिटांनी दवाखान्यात दाखल झाले व त्यांना उपचार दिले. श्री.पपीन शामराव चौधरी हे महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत. त्यांच्या सेवाशर्तीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियमानुसार चौकशी काळाकरिता निलंबीत केले आहे. निलंबन केल्यानंतर तपशिलवार दोषारोपपत्र दिले आहे व त्यावर त्यांचा खुलासा मागविलेला आहे. तसा त्यांनी लेखी खुलासा दि.२१/०२/२०२५ रोजी सादर केलेला आहे. स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमून नैसर्गिक न्याय तत्वानुसार श्री.पपीन शामराव चौधरी यांची चौकशी घेण्यात येणार आहे व श्री. पपीन शामराव चौधरी यांना बचावाची पूर्ण संधी मिळणार आहे. आरोपपत्रातील दोषारोपाबाबत स्वतंत्र चौकशी अधिका-यासमोर चौकशी होणार असल्याने, आरोपपत्राच्या तपशिलाबाबत आत्ता येथे कथन करीत नाही.

श्री.पपीन शामराव चौधरी यांच्या हातून घडलेल्या गंभीर गैरकृत्याबाबत त्यांना निलंबीत करून दोषारोपपत्र देवून चौकशी घेण्यात येत आहे व व्यवस्थापन नियमानुसार असलेल्या महाविद्यालयासारख्या ठिकाणी शिस्त ठेवण्याकरिता आपल्या अधिकाराचा वापर करीत आहे व त्या अधिकारास हरकत घेण्यास कोणतेही कारण नाही.

श्री.पपीन शामराव चौधरी यांनी जोडलेल्या तक्रारीबाबत उत्तर :-

(१) श्री.पपीन शामराव चौधरी यांनी जोडलेल्या तक्रारीमधील सर्व मजकूर खोटा व चूकीचा आहे. त्यांचे वर्तन हे शिस्तभंगाच्या कृत्याने झाले आहे व त्याबाबत त्यांच्यावर कारवाई केली आहे. सबब त्यांच्या तक्रारीत परिच्छेद क्र. १ मधील मजकूर चुकीचा आहे.

(२) तक्रारीतील परिच्छेद क्र. २ मधील मजकूर चुकीचा आहे. तक्रारीत जाबदार क्र. १ व २ असून ३ क्रमांकाचा ज़ाबदार नाही. तरीही त्याच्याबाबत कथन केले आहे.

(३) तक्रारीत परिच्छेद क्र. ३,४,५,६ मधील मजकूर पूर्णपणे चुकीचा आहे खोटा व रचनात्मक आहे. श्री.पपीन शामराव चौधरी यांच्याकडून गंभीर गैरकृत्ये झाली असताना सुध्दा त्यांच्यावर शिस्तभंगाची

कडक कारवाई न करता सौम्य कारवाई करून त्यांना वर्तनात सुधारणा करण्याची संधी दिली. त्यांनी केलेल्या कारवाईबाबत आत्ता प्रथमच या तक्रारीमध्ये तथाकथित दमदाटी, खालच्या दर्जाची भाषा वापरणे, षडयंत्रे याबाबत कथन केले आहे व यापूर्वी कोणतीही तक्रार केलेली नाही. तसेच दि.०२/०२/२०२४ च्या नोटराईज्ड हमीपत्राबाबत, अपहाराचे रू.८०,०००/- जमा करण्याच्या कृतीबाबत व दि.२६/०२/२०२४ च्या पदावनतीच्या आदेशाबाबत अवाक्षरही कथन करीत नाही व तक्रार निवारण समितीच्यापासून याबाबी जाणीवपूर्वक लपवून ठेवत आहेत. (Deliberate Suppression of Material Facts) त्यामुळे या कारणास्तव श्री.पपीन शामराव चौधरी यांची तक्रार फेटाळण्यास पात्र आहे.

(४) तक्रारीतील परिच्छेद क्र. ७ ते ११ मधील मजकूर पूर्णपणे खोटा व चूकीचा आहे. त्याचा स्पष्ट शब्दात इनकार करीत आहोत. त्यांच्या हातून घडलेल्या गैरवर्तनाबाबत तपशिलवार दोषारोपपत्र दिले आहे. त्यावर त्यांचा खुलासा मागवला आहे. तो त्यांनी दिला आहे. व दोषारोपपत्राबाबत निर्णय स्वतंत्र चौकशी अधिका-यासमोर नैसर्गिक न्याय तत्वानुसार नोंदवलेल्या पुराव्याची शहानिशा होवून होणार आहे. सबब परिच्छेद क्र. ७ ते ११ बाबत कथन करीत नाही.

(५) अशा परिस्थितीत त्यांच्यावर केलेली कारवाई नियमानुसार आहे व ती रदद् करण्याचे कोणतेही कारण नाही.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुतचे प्रकरणी तक्रादार हे जाबदार संस्थेमध्ये आणि जाबदार महाविद्यालयामध्ये कार्यरत आहेत आणि त्यांना दिनांक २४/०१/२०२५ रोजी निलंबित करण्यात आलेले आहे ही बाब उभयपक्षी मान्य आहे. ज्या घटनेकरिता तक्रारदाराला निलंबित करण्यात आलेले आहे ती अशी आहे की, दिनांक २४/०१/२०२५ रोजी तक्रारदार यांनी महाविद्यालयाचे अधीक्षक श्री.अनोश सदाशिव गायकवाड यांना पाठीमागून जोरात कानफटीत मारली आहे व त्या मारहाणीमुळे श्री. अनोश गायकवाड यांना दवाखान्यात जावे लागले. त्या घटनेकरिता विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेऊन जाबदारांनी तक्रारदाराविरुध्द खाते निहाय चौकशी देखील सुरु केलेली होती. त्यांना दोषारोप पत्र देण्यात आले असून आता तक्रारदाराचा खुलासा देखील मागविण्यात आलेला आहे. स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमून नैसर्गिक न्याय तत्वानुसार तक्रारदाराची विभागीय चौकशी करण्यात येईल असे जाबदारांचे म्हणणे आहे.

तक्रारदाराचे ज्या कारणाकरिता/घटनेकरीता निलंबन करण्यात आलेले आहे ते कारण/घटना घडलेली आहे किंवा नाही, या बाबतची चौकशी ही या समितीच्या कार्यकक्षेबाहेरची आहे. याबाबतची सत्याअसत्यतेसाठी स्वतंत्रपणे विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली असून ती प्रलंबित आहे ही बाब

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

उभयपक्षी यांना मान्य आहे. तक्रारदाराचे कथन असे आहे की, त्यांचे करण्यात आलेले निलंबन आणि त्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेली खातेनिहाय चौकशी ही बेकायदेशीर असून ती थांबवावी आणि तक्रारदारास या पुढे कोणताही बेकायदेशीर त्रास देऊ नये ताकीद जाबदाराना देण्यात यावे अशी तक्रारदाराची मागणी होती.

तक्रारदाराच्या या तक्रार अर्जात केलेल्या मागण्या यांना कायदयाचे कुठलेही अनुष्ठान नाही. तक्रारदाराकडून बेकायदेशीर वर्तनाची घटना घडली त्या घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत, ही बाब दाखल केलेल्या कागदपत्रावरुन स्पष्टपणे दिसून येते. जाबदार क्रं. २ संस्था हे तक्रारदाराचे नियुक्ती अधिकारी (Appointing Authority) आहेत ही बाब तक्रारदारांनी मान्य केलेली आहे. तक्रारदार स्वतः जाबदार संस्थेमध्ये शिपाई या पदावर कार्यरत आहेत. त्यांची सेवा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम, १९७९ च्या नियमास अधीन आहे. या ठिकाणी हे स्पष्ट केले पाहिजे की, तक्रारदाराचे निलंबन शिक्षा म्हणून नव्हे तर, त्या विरूध्दच्या आरोपांखाली, खातेनिहाय चौकशी करणेकरीता, केलेले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चा भाग- २ मध्ये नियम क्रं.४ (१) अन्वये निलंबनाची कारवाई करता येते. सदरचा नियम खालीलप्रमाणे आहे.-

निलंबन (१) नियुक्ती प्राधिकरण किंवा नियुक्ती प्राधिकरण ज्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली आहे असे कोणतेही प्राधिकरण किंवा राज्यपालांनी यासंबधात सर्वसाधारण व विशेष आदेशाव्दारे अधिकार प्रदान केलेले अन्य कोणतेही प्राधिकरण, शासकीय कर्मचा-याला-

(अ) ज्या बाबतीत, त्याच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे योजिले असेल किंवा अशी कार्यवाही प्रलंबित असेल, किंवा,

(ब) ज्या बाबतीत, तो कर्मचारी राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बाधक ठरणा-या कार्यांमध्ये गुंतलेला आहे असे पूर्वोक्त प्राधिकरणाचे मत असेल, किंवा

(क) ज्या बाबतीत, त्याच्याविरूध्द कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या संबंधात खटल्याचे अन्वेषण, चौकशी किंवा न्यायचौकशी चालू असेल, अशा बाबतीत निलंबनाधीन ठेवू शकेल.

परंतू नियुक्ती प्राधिका-यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिका-याने निलंबनाचा आदेश काढला असेल त्याबाबतीत अशा प्राधिकरणाने ज्या परिस्थितीत प्रस्तुत आदेश काढला असेल ती परिस्थिती ते प्राधिकरण तात्काळ नियुक्ती प्राधिका-याला कळवील.

सदर नियमानुसार नियुक्ती प्राधिकरण किंवा नियुक्ती प्राधिकरण ज्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली आहे असे कोणतेही प्राधिकरण ज्याच्या बाबतीत त्याच्या विषयक कारवाई करण्याचे योजिलेले असेल, किंवा अशी कारवाई प्रलंबित असेल त्या वेळेला अशा कर्मचा-याला कर्मचा-याला

निलंबित करू शकते. तथापि अशा कर्मचा-याला निलंबित करावे का न करावे हा नियुक्ती प्राधिकरणाचा स्वेच्छा अधिकार आहे. प्रस्तूत प्रकरणामध्ये तक्रारदाराने सदर स्वेच्छा अधिकाराचा वापर करण्याबाबत कायदे समंत कोणताही उजर घेतलेला नाही. ज्या घटनेसंबंधित तक्रारदाराविरुध्द शिस्तभंगाची कारवाई योजिलेली आहे ती घटना तक्रारदाराच्या नियुक्ती प्राधिकरणासमोर म्हणजेच महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या दालना शेजारी घडलेली आहे आणि त्याच घटनेसंबंधी तक्रारदाराविरुध्द शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करुन तक्रारदाराला चौकशी दरम्यान निलंबित करण्यात आलेले आहे. सकृतदर्शनी नियुक्ती प्राधिकरणाने तक्रारदाराला निलंबित करण्याचा दिलेला आदेश हा नियमानुसार देण्यात आल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणामध्ये तक्रारदारांनी ज्या घटनेबद्दल त्या विरुध्द त्याचे निलंबन करुन खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. त्या घटनेबद्दलच्या काही सी.डी. आणि काही पेन ड्राईव्ह या समिती पुढे दाखल करुन त्या सी.डी.आणि पेन ड्राईव्ह याचे या समितीने निरीक्षण करुन सदर घटना घडलेली नाही असा निष्कर्ष काढावा असा आग्रह धरला होता. केवळ त्यांच्या समाधानाकरिता त्यांनी सादर केलेल्या सी.डी. आणि पेन ड्राईव्हचे निरीक्षण या समितीने आज दिनांक ११/०८/२०२५ रोजी केलेले आहे. त्या सी.डी.च्या निरीक्षणात समितीला जे काही आढळून आले ते आम्ही या आदेशात नमूद करु इच्छित नाही. कारण आम्ही घटनेसंबधी काही निरीक्षणे या आदेशात नोंदविली तर त्याचा प्रत्यक्ष परिणाम त्या तक्रारदाराविरुध्द् चालू असणा-या खातेनिहाय चौकशीच्या अनुमानावरती होऊ शकतो. म्हणून त्या सी. डी. आणि पेन ड्राईव्हच्या निरीक्षणाबद्दल या आदेशात आम्ही काहीही नमूद करु इच्छित नाही.

तक्रारदारांने या समितीसमोर त्यांच्या विरुध्द लावण्यात आलेले आरोप कसे खोटे आहेत आणि कशा प्रकारे जाबदार हे त्याच्या विरुध्द व्देष भावनेने प्रेरित आहेत याचा ऊहापोह त्यांनी केलेला आहे. तथापि, त्या सर्व बाबींचा या समितीला विचार करता येऊ शकत नाही. कारण या तक्रारीचे स्वरुप एवढेच आहे की, तक्रारदाराचे करण्यात आलेले निलंबन आणि त्या विरुध्द योजिलेली खातेनिहाय चौकशी ही तक्रारदार म्हणतात त्याप्रमाणे बेकायदेशीर आहे किंवा नाही. या सर्व गोष्टी खातेनिहाय चौकशी मध्ये चौकशी अधिका-यासमोर मांडण्याची तक्रारदाराला संधी उपलब्ध आहे. तक्रारदाराविरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्याबाबतीत ही समिती तक्रारदारानी केलेल्या निवेदनावरती कोणतेही मत प्रदर्शित करु शकत नाही. कारण त्या मतांचा चौकशी अधिका-यांच्या निर्णयावर विपरित परिणाम होऊ शकतो. या समितीसमोर केवळ एकच प्रश्न उद्भवतो तो म्हणजे तक्रारदाराचे निलंबन हे बेकायदेशीर आहे आणि किंवा नाही. या प्रश्नाचे उत्तर सरळसरळ नाही असे आहे. त्यामुळे तक्रारदाराच्या म्हणण्यात या समितीला कोणतेही तथ्य दिसून येत नाही. तक्रारदाराच्या मागणीस कोणत्याही कायदयाचे अनुष्ठान नाही. सबब, तक्रारदार मागणी करतात त्याप्रमाणे त्यांची त्या

तक्रार अर्जातील कोणतीही मागणी मान्य करता येऊ शकत नाही असे या समितीचे ठाम मत आहे. सबब, समिती खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१.प्रस्तुतची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.
२.प्रस्तुतची तक्रार दफ्तरी दाखल करण्यात यावी.
झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 26 SEP 2025

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)